**बैंक ऑफ महाराष्ट्र**
**Bank of Maharashtra**
भारत सरकार का उद्यम
*एक परिवार एक बैंक*

**आस्ति वसुली शाखा :** आगरकर हायस्कूल बिल्डींग, दुसरा मजला,
सोमवार पेठ, पुणे-४११०११.फोन : ०२०-२६१३००३०, २६१३००२९.
ईमेल : bom1453@mahabank.co.in
**मुख्य कार्यालय :** १५०१, 'लोकमंगल', शिवाजीनगर, पुणे-४११००५

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
we are committed to the success of 'Swachhta Abhiyan'

# स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्रीची सूचना

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रुल ८ (६) च्या अटींनुसार स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई-ऑक्शन विक्रीची जाहीर सूचना.**

या ठिकाणी सर्वसाधारणपणे जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की, पुढे नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको (सिक्युअर्ड क्रेडीटर) यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून बँक ऑफ महाराष्ट्र यांचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला असून बँक ऑफ महाराष्ट्र, सुरक्षित धनको (सिक्युअर्ड क्रेडीटर) यांनी खाली नमूद केलेल्या कर्जदार व जामीनदार यांच्याकडून बँकेला येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या मालमत्तांची **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर खाली नमूद केलेल्या तारखांना विक्री करण्याचे ठरविले आहे. राखीव किंमत आणि बयाणा रक्कमेचा तपशील खाली दिला आहे.

| अ. क्र. | कर्जदारांचे नाव | जामीनदार/संचालक/भागीदार/प्रोप्रायटर यांची नावे | मालमत्तेचा तपशील | ताबा आणि बोजा, असेल तर | येणे रक्कम (रु) | राखीव किंमत (रु) | बयाणा रक्कम (रु) | ऑनलाईन बोली सादर करण्याची अंतिम तारीख | मालमत्तांच्या पाहणीची तारीख व वेळ | ई-ऑक्शन प्रारंभ करण्याची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. हॉटेल निशा | १) प्रोप्रा. सूरज शशि म्हेत्रे<br>२) श्री. खाडू बाबूराव जाधव<br>३) श्री. विकास पापा चव्हाण | पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग : घराचे तळघर, नं. २१४६, जीएलआर नं. ३९०/२९२९, एकूण क्षेत्रफळ १०७३ चौ.फू. म्हणजेच ९९.७२ चौ.मी., न्यू मोदी खाना, पुलगेट पोलिस चौकीसमोर, ट्रायलक रेस्टॉरंटमागे, कावेडीया चेस्ट केअर सेंटरजवळ, कॅम्प ता. हवेली, जि. पुणे, पुणे कॅन्टॉन्मेंट एरिया यांच्या हद्दीत आणि नोंदणीकरण निबंधक जि. पुणे-४११००१ यांच्या हद्दीत, ता. हवेली, उपजिल्हा पुणे येथे स्थित. **उत्तरेस** : सार्वजनिक रस्ता, **दक्षिणेस** : सार्वजनिक मैदान, **पूर्वेस** : भवानी हॉटेल आणि **पश्चिमेस** : सूरज म्हेत्रे यांच्या मालकीचा सार्वजनिक रस्ता. | प्रतिकात्मक ताबा बोजा माहित नाही | रु. २७,२७,१७१.२० (रु. सत्तावीस लाख सत्तावीस हजार एकशे एक्काहत्तर आणि पैसे वीस फक्त) अधिक त्यावरील दि. २६/०६/२०१३ पासूनचे व्याज अधिक किंमत, आकार व खर्च. | रु. ४१,२०,०००/- | रु. ४,१२,०००/- | २३/०१/२०२० | दि. ०४/०१/२०२० दु. १२.०० ते दु.२.३० पूर्वनियोजित भेटीच्या वेळेनुसार | दि. २७/०१/२०२० स. ११.०० ते दु. १२.०० दरम्यान |

**महत्वाच्या अटी आणि शर्ती : १)** इच्छुक प्रस्तावक आपला प्रस्ताव सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी वर नमूद केलेल्या तारखेला करु शकतात. प्रस्तावकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ई-ऑक्शनमध्ये सहभागी होण्यापूर्वी मालमत्तेचा मालकी हक्क तसेच सदर मालमत्तांवर काही बोजा/थकबाकी आहे का, याची स्वत: खात्री करुन घ्यावी. **(२)** इच्छुक प्रस्तावक आणि/अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी त्यांचे वैध ओळखपत्र/पॅनकार्ड सोबत आणावे. अन्यथा त्यांना मालमत्तेची पाहणी करु देण्यात येणार नाही. **(३)** कर्जदार / जामिनदार / गहाणदार यांनी बँकेला येणे असलेल्या संपूर्ण रक्कमेची परतफेड सदर नोटीस प्रसिध्द होण्याच्या तारखेपूर्वी केल्यास सदरचे ई-ऑक्शन रद्द करण्यात येईल. **(४)** लिलावाने विक्री ऑनलाईन ई ऑक्शन/बिडींग पध्दतीने **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटवर वर नमूद केलेल्या संबंधित तारीख व वेळेस प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह होईल. **(५)** इच्छुक प्रस्तावकाकडे स्वतःचा वैध ईमेल आयडी आणि डिजिटल सिग्नेचर असेण आवश्यक आहे. ई-ऑक्शन संदर्भातील तपशीलासाठी **मे. सी. १ इंडिया, उद्योग विहार, फेज २, गल्फ पेट्रोकेम बिल्डींग, बिल्डींग नं. ३०१, गुरगांव, हरियाणा, पिन १२२ ०१५, हेल्पलाईन नं. +९१-१२४-४३०२०२०/२१/२२/२३/ २४, +९१-९५९४५९७५५५, हेल्प लाईन ई-मेल support@bankeauctions.com** यांच्याशी संपर्क साधावा. **(६)** प्रस्तावकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी आपला प्रस्ताव सादर करण्यापूर्वी आणि ई-ऑक्शन विक्री प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी ई-ऑक्शन सेलच्या अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी वेबसाईट **https://www.bankeauctions.com** किंवा **www.bankofmaharashtra.in** पहावी. **(७)** इच्छुक प्रस्तावक ई विक्रीच्या तारखेच्या आधी ई-ऑक्शनसंदर्भातील ऑनलाईन ट्रेनिंग **मे. सी १ इंडिया, उद्योग विहार, फेज २, गल्फ पेट्रोकेम बिल्डींग नं. ३०१ गुरगांव, हरीयाणा, पिन १२२०१५, हेल्प लाईन नं.+९१-१२४-४३०२०२०/२१/२२/२३/२४, +९१-९५९४५९७५५५, हेल्प लाईन ई मेल आयडी support@bankeauctions.com** यांच्याकडून मिळवू शकतात. **(८)** जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यानुसारच व संबंधित तपशिलासह ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत. **(९)** बयाणा रक्कम अनामत (ईएमडी) आरटीजीएस/एनईएफटी च्या माध्यमातून अकाऊंट नंबर **60116202193,** बँक ऑफ महाराष्ट्र, आस्ति वसुली शाखा, आयएफएससी कोड - MAHB0000941 येथे ऑनलाईन निविदा सादर करण्यापूर्वी जमा करावी. **(१०)** ऑनलाईन निविदा फॉर्मची कॉपी (एन्क्लोजर्ससह यूटीआर नंबरचाही उल्लेख करून) अधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र, आस्ति वसुली शाखा, यांच्याकडे **समक्षरित्या** वर दिलेल्या पत्त्यावर **दि. २४/०१/२०२० रोजी** किंवा त्यापूर्वी पोहोचेल अशा बेताने पाठवावी. **(११)** दाखल करावयाच्या प्रस्तावाची रक्कम राखीव किंमतीपेक्षा अधिक असावी आणि प्रस्तावकांनी त्यांचे प्रस्ताव रू. ५०,०००/- (रू.पन्नास हजार फक्त) च्या पटींमध्ये वाढवावेत. **(१२)** यशस्वी प्रस्तावकास खरेदी रकमेच्या २५% रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रकमेसह) ई-ऑक्शन विक्री प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्वरीत वर नमूद केलेल्या विक्रीबाबतच्या कलम ९ नुसार जमा करावी लागेल. प्रस्तावाची उर्वरित रक्कम प्रस्ताव स्वीकृतीनंतर १५ दिवसांच्या आत जमा करावी लागेल. **(१३)** कोणतीही पूर्वसूचना किंवा कारण न देता कोणताही प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे तसेच विक्रीची प्रक्रिया स्थगित करणे / पुढे ढकलणे / विक्री रद्द करणे / विक्रीच्या अटी आणि शर्तींमध्ये बदल करणे याचा संपूर्ण अधिकार बँकेच्या अधीन आहे. **(१४)** ई-ऑक्शनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्याच्या / तिच्या / त्यांच्या ओळखीचा, निवासाचा आणि अधिकाराचा पुरेसा आणि ग्राह्य पुरावा तसेच पॅनकार्ड अपलोड आणि सादर करावा. **(१५)** जर काही कारणास्तव लिलावाने विक्री / ई-ऑक्शन विक्री प्रक्रिया ठरलेल्या तारखेला झाली नाही, तर सदर विक्री नंतर येणाऱ्या तारखेला केली जाईल, व त्यासंदर्भातील सूचना आधी प्रसिद्ध केली जाईल. **(१६)** सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल. **(१७)** बोलीदारांनी स्वत:च्या हितासाठी अखेरच्या क्षणी बोली मांडणे टाळावे. अशा प्रकरणात जर काही कमतरता / असफलता (इंटरनेट फेल्युअर, पॉवर फेल्युअर) असेल तर त्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र किंवा सेवा प्रदान करणारी संस्था जबाबदार असणार नाही. अशा प्रकारची अडचणीची परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी अशा परिस्थितीत आवश्यक ती सर्व व्यवस्था करुन ई-ऑक्शनमध्ये यशस्वीपणे सहभागी व्हावे, तसेच अशा प्रकारे गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी आपली बोली लावण्यासाठी अखेरच्या क्षणाची वाट पाहू नये. **(१८)** बँक, कोणत्याही परिस्थितीत इच्छुक प्रस्तावकाने जमा केलेल्या कोणत्याही रक्कमेवर कोणतेही व्याज देणार नाही. **(१९)** सदर ई-ऑक्शन संदर्भातील कोणत्याही प्रकारचा वाद हा पुणे, महाराष्ट्र राज्य, भारत येथील न्यायाधिकरणाच्या अखत्यारितील न्यायालयांच्या अधीन राहील. **(२०) संपर्क करण्यासाठी शाखेचा अधिकृत फोन नं. : श्री. प्रगतीकुमार, मो.नं. : ९५९५०९८३३३, फोन : ०२०-२६१३००२९/३०.**

सदर जाहिरात ही संबंधित ॲक्ट आणि रूलमध्ये निर्देशित केल्यानुसार कर्जदार/जामिनदार/गहाणदार यांच्यासाठी अनिवार्य वैधानिक सूचना आहे. तसेच त्यांना ई-ऑक्शनसाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तेला अधिकतम चांगले प्रस्ताव प्राप्त करण्याची मुभा देण्यात येत आहे.

**दिनांक : २५/१२/२०१९**
**स्थळ : पुणे**

सही/-
**सहाय्यक महाप्रबंधक व अधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र**